(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**<u>प्रकाशनयोग्य</u>**

# भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

## दिवाणी अपिलीय अधिकारिता

### दिवाणी अपील क्रमांक १३१२-१३१३/२०२३

### [@ विशेष अनुमती याचिका ( दिवाणी ) क्रमांक १३४७८ -१३४७९/ २०२२]

संवरलाल अग्रवाल आणि इतर .... अपीलकर्ते

विरुद्ध

अशोक कुमार कोठारी आणि इतर ... उत्तरवादी

**<u>न्यायनिर्णय</u>**

**<u>एस रवींद्र भट, न्यायमूर्ती</u>**

१. अनुमती मंजूर. मुंबई उच्च न्यायालयाचा दिनांक १४.०६.२०२२[1] रोजीचा

1 संवरलाल अग्रवाल वि. अशोक कुमार ठाकूर, अपील (एल) क्र. ३०७५/२०२१ आणि ३०७९/२०२१.

सामायिक आक्षेपित न्यायनिर्णय आणि अंतिम आदेश, ज्याद्वारे एकल न्यायाधीशांचा दिनांक ०४.०१.२०२१[2] रोजीचा आदेश कायम करण्यात आला, त्याविरुद्ध ही दोन अपीले दाखल करण्यात आली आहेत.

**I. तथ्यात्मक पार्श्वभूमी** :

मालाड, मुंबई येथे बहुउद्देशीय रुग्णालय चालवण्यासाठी पक्षकारांनी सन २०१७ मध्ये संयुक्त उपक्रम करार केला. या प्रकल्पास अर्थसहाय्य करण्यासाठी समान भागधारकांनी प्रत्येकी रुपये १० कोटी इतकी रक्कम बिनव्याजी कर्ज म्हणून दिली. दिनांक २७.०३.२०१९ रोजी उत्तरवादी (यापुढे 'कोठारी') यांनी अपीलकर्त्यांच्या ( यानंतर 'अग्रवाल' यांच्या) संपूर्ण पन्नास टक्के समभागांसाठी बोली लावली, जी स्वीकारण्यात येऊन दिनांक २८.०३.२०१९ रोजीच्या ईमेल द्वारे लिखित स्वरूपात मांडण्यात आली. त्यात नमूद केलेल्या अटी पुढीलप्रमाणे आहेत :

> "तुम्ही मान्य केलेल्या आणि आम्हाला सुद्धा मान्य असलेल्या अटी आणि शर्ती पुढील प्रमाणे आहेत :
>
> १. मोबदला - रुपये ३६.७५ कोटी
>
> २. टोकन - मोबदल्याच्या ५ टक्के इतकी रक्कम.
>
> ३. मोबदल्याची पुढील ५० टक्के रक्कम ४५ दिवसांत आणि

2 अशोक कुमार कोठारी वि. संवरलाल अग्रवाल, व्यावसायिक दावा क्र. ८४४/२०१९ मधील अंमलबजावणी अर्ज (एल) क्र. १७१३/२०१९ आणि १३९/२०२० .

त्यानंतर कोठारी ग्रुप यांना प्रकल्पाचे काम सुरू करण्याची परवानगी दिली जाईल.

४. मोबदल्याची शिल्लक ४५ टक्के रक्कम - १२० दिवसांत.

४५ दिवसांत ५० टक्के रक्कम अदा न केल्यास, ४५ व्या दिवशी ५ टक्के टोकन रक्कम जप्त केली जाईल आणि कोठारी ग्रुपच्या ५० % समभागांची अग्रवाल ग्रुपला त्याच अटी व शर्तीवर रुपये ३५ कोटी इतक्या त्यांच्या बोली रकमेवर आपोआप विक्री केली जाईल. अंतिम ४५ टक्के रक्कम वेळेत अदा न केल्यास, १२० व्या दिवशी, मोबदल्याची ५ टक्के रक्कम जप्त केली जाईल आणि कोठारी ग्रुपच्या ५० % समभागांची अग्रवाल ग्रुपला त्याच अटी व शर्तीवर रुपये ३५ कोटी इतक्या त्यांच्या बोली लावलेल्या रकमेवर विक्री केली जाईल. उर्वरित मोबदल्याकरता अग्रवाल ग्रुप कोणतेही व्याज देणार नाही.

व्यवहाराचा दिनांक २७ मार्च, २०१९."

३. त्यानंतर रुपये १,८३,७५,०००/- ( किंवा ५ टक्के) इतकी टोकन रक्कम अदा करण्यात आली (त्यापैकी रुपये १,२५,०००/- इतक्या रकमे करिता, जी अग्रवाल यांच्या खात्यामध्ये कधीही जमा झाली नाही, हरकत घेण्यात आली). परंतु, दिनांक २९.०३.२०१९ रोजी कोठारी यांनी रुपये ३६.७५ कोटी इतक्या रकमेच्या

मोबदल्याचे विभाजन ईमेल द्वारा सादर केले, जे पुढीलप्रमाणे आहे :

> " प्रारंभी कृपया याची नोंद घ्यावी की, तुम्हाला देय असलेल्या रुपये ३६.७५ कोटी इतक्या एकूण मोबदल्याच्या रकमेत पुढील रकमेचा समावेश आहे -
>
> अ. कंपनीतील तुमच्या ५० टक्के समभागांची एकूण किंमत रु. २६,४५,४५,०००/- ( रुपये सव्वीस कोटी पंचेचाळीस लाख पंचेचाळीस हजार फक्त)
>
> ब. कंपनीकडे असलेली तुमच्या ग्रुपच्या कर्जाच्या परतफेडीची रक्कम रु. १०,२९,५५,०००/- ( रुपये दहा कोटी एकोणतीस लाख पंचाव्वन्न हजार फक्त), जी तुम्हांला कंपनीच्या बँक खात्यामधून अदा व परतफेड केली जाईल."
>
> ( यावर भर देण्यात आला आहे. )

कर्जाची रक्कम अंतर्भूत केल्याची ही बाब अग्रवाल यांना मान्य नव्हती आणि त्यांनी नंतर दिनांक ०३/०४/२०१९, ११/०४/२०१९, १९/०४/२०१९ आणि २०/०४/२०१९ रोजी पाठविलेल्या ईमेल द्वारे ती बाब स्पष्टपणे नाकारली.

४. दिनांक २८.०३.२०१९ रोजीचा करारनामा अग्रवाल यांच्यावर बंधनकारक होता हे आणि त्याचे विनिर्दिष्ट पालन करण्याचे घोषित करण्याकरिता, दिनांक ३०.०४.२०१९ रोजी कोठारी यांनी व्यावसायिक दावा क्रमांक ८४४/२०१९ दाखल

केला. त्यानंतर दिवाणी प्रक्रिया संहिता , १९०८ ( यापुढे सीपीसी ) च्या आदेश १२ नियम ६ नुसार, दिनांक २९.०७.२०१९ रोजी नोटीस ऑफ मोशन क्रमांक १६१९/२०१९ दाखल केली, ज़्यादवारे दाखल करून घेतल्यानंतर हुकूमनामा देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यावर दिनांक ०५.०८.२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे निवाडा देण्यात आला आणि त्यामध्ये खालील अटी नमूद केल्या होत्या :-

> "१. प्रतिवादी क्रमांक २ डॉक्टर विकास अग्रवाल, ज्यांचे असे म्हणणे आहे की त्यांना इतर प्रतिवादींच्या वतीने म्हणणे मांडण्याचा सूचना आहेत, यांच्या सूचनेवरून श्री सरोगी आणि श्री हाकानी असे सांगतात की प्रार्थना कलम (अ) ते ( ड) नुसार ते हुकूमनाम्याबाबत सादर करीत आहेत :
>
> (अ) असे की, वादी क्रमांक ६ यांच्या भांडवलामधील अग्रवाल ग्रुपने धारण केलेल्या ५० टक्के समभागांबद्दल प्रतिवादी क्रमांक २ यांनी लिखित स्वरूपात दिलेला आणि दिनांक २८ मार्च, २०१९ रोजीच्या ईमेल द्वारे नोंदविण्यात आलेला, दिनांक २७ मार्च, २०१९ रोजीचा सदर करारनामा हा वैध आणि अस्तित्वात आहे आणि प्रतिवादी यांच्यावर आणि प्रतिवादींच्या वतीने, मार्फत आणि त्यांच्यानुसार दावा करणाऱ्या व्यक्तींवर बंधनकारक आहे असे माननीय न्यायालयाने घोषित करावे.
>
> (ब ) इतर गोष्टींबरोबरच

( i ) वादी क्रमांक सहा मधील प्रतिवादीचे पन्नास टक्के समभाग वादी किंवा त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तीच्या नावे हस्तांतरीत, अभिहस्तांकित आणि निहीत करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व आवश्यक विलेख आणि कागदपत्रे निष्पादित करून, स्वाक्षरी करून आणि प्रमाणित करून,

(ii ) प्रतिवादी क्रमांक २ कडे आणि प्रतिवादी क्रमांक २ आणि वादी क्रमांक २ द्वारे संयुक्तपणे वापरल्या जाणाऱ्या लॉकर मध्ये असलेले दाव्यातील भूखंडाच्या संदर्भात मूळ मालकी हक्काचे विलेख आणि लेख वादींना सुपूर्द करून,

(iii ) सर्व कृती, कृत्ये, बाबी आणि गोष्टी करणे किंवा करविणे आणि अग्रवाल समूहाच्या उक्त ५०% समभागांचे फिर्यादी क्रमांक १ ते ५ यांना हस्तांतरण करण्यासाठी आणि / किंवा त्यांच्या नामनिर्देशितांना, प्रतिवादींच्या सर्व दाव्यांपासून मुक्त करण्यासाठी आवश्यक असेल ते सर्व विलेख, कागदपत्रे आणि लेखांवर स्वाक्षरी करणे, ते निष्पादित करणे आणि नोंदणी करणे यासाठी,

(iv ) वादी क्रमांक ६ कंपनीच्या संचालक पदावरून राजीनामा देऊन,

लिहून ठेवल्याप्रमाणे आणि प्रतिवादी क्रमांक २ यांच्या दिनांक २८ मार्च २०१९ च्या ई-मेल मध्ये नमूद केल्याप्रमाणे,

वादी क्रमांक ६ मधील प्रतिवादी यांचा ५० % समभागांच्या विक्रीकरिता झालेल्या दिनांक २७ मार्च २०१९ चा सदर करारनाम्याचे विनिर्दिष्ट पालन करण्याचा आदेश आणि हुकूमनामा या मा. न्यायालयाने वादी यांच्या लाभात द्यावा.

(क ) या माननीय न्यायालयाने विनिर्दिष्ट पालन करण्याच्या आदेशाच्या उद्देशाने किंवा वरील प्रार्थनेच्या (ब ) संदर्भात मागितलेल्या दिलशांच्या अंमलबजावणीसाठी प्रतिवादींना या मा. न्यायालयाच्या देखरेखीखाली सर्व कृती, कृत्ये आणि बाबी करण्यास किंवा करविण्यास आवश्यक असलेले सर्व विलेख, कागदपत्रे किंवा लेख स्वाक्षरी करून व निष्पादित करून अंमलात आणण्याचे आदेश आणि हुकूमनामे द्यावेत.

(ड ) प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीत ह्या माननीय न्यायालयाला न्याय आणि योग्य वाटेल त्याप्रमाणे उपरोक्त उद्देशांसाठी सर्व चौकशी केली जावी, निवाडे, आदेश, निर्देश दिले जावे आणि हिशेब घ्यावा.

२. करारात नमूद केलेली समय सीमा आजपासून सुरु होईल.

३. त्यानुसार दावा निकाली निघाला आहे तसेच नोटीस ऑफ मोशन हि निकाली निघाले आहे .

४. नियमानुसार न्यायालयीन शुल्काचा परतावा, जर असेल तर

५. हुकूमनामा तयार करण्यापासून सूट दिलेली आहे .

६. या आदेशाच्या प्रमाणित प्रति प्रमाणे सर्वांनी कृती करावी.

(के. आर. श्रीराम, न्या.)"

५. अशा प्रकारे दाव्यामध्ये हुकूमनामा पारित झाल्यानंतर, पक्षकारांच्या वकिलांनी फारसा यशस्वी न होऊ शकलेला पुढील पत्रव्यवहार केला. परिणामी, कोठारी यांनी दिनांक १३.०९.२०१९[3] रोजी आणि त्याचप्रमाणे अग्रवाल[4] यांनी दिनांक १६.०१.२०२० रोजी अंमलबजावणी याचिका दाखल केली. अनेक अंतरिम अर्जसुद्धा दाखल केले गेले. दिनांक ०४.०१.२०२१ रोजीच्या सामायिक आदेशाद्वारे एकल न्यायाधीशांनी असा निर्णय दिला की, हुकुमनामा संदिग्ध होता. अग्रवाल यांनी नोटिस ऑफ मोशनला कधीही काहीही उत्तर दिले नव्हते किंवा लेखी जबाबसुद्धा दाखल केला नव्हता हे नमूद करताना अंमलबजावणी न्यायलयाने आपल्या अधिकारितेचा वापर करून असा निर्णय दिला की, वादकथनाचा विचार करता, हुकूमनाम्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी न्यायालय सक्षम होते. न्यायालयाने दाव्यामधील खाली नमूद केलेल्या प्रार्थना कलम भाग ब २ (iii) यावर भर दिला :

"(ब) सन्माननीय न्यायालयास विनंती करण्यात येते

की, आदेश आणि हुकूमनामा पारित करून प्रतिवादीस

3 अंमलबजावणी अर्ज (एल) क्र. १७१३/२०१९.

4 अंमलबजावणी अर्ज (एल) क्र. १३९ /२०२०.

निर्देश देण्यात यावेत की, दिनांक २७ मार्च, २०१९ रोजी, वादी क्रमांक सहा मधील प्रतिवादींनी धारण केलेल्या समभागांमधील पन्नास टक्के भागांची विक्री करण्यासंबंधात लिखित स्वरूपात तयार करण्यात आलेल्या करारनाम्याची आणि इतर गोष्टींसोबतच दिनांक २८ मार्च, २०१९ रोजीच्या ईमेलद्वारे पाठविण्यात आलेल्या संदेशाची विशिष्ट पूर्तता करण्यात यावी.

****

(iii) अग्रवाल गटाचे, प्रतिवादींच्या सर्व दाव्यांपासून मुक्त असे सदर ५० % समभाग फिर्यादी क्रमांक एक ते पाच आणि / किंवा त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींकडे हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक असेल ती कृत्ये करणे, दस्त बनविणे, प्रकरणे आणि गोष्टी करणे अथवा करून घेणे आणि अशा सर्व दस्तांवर,

कागदपत्रांवर आणि लिखाणावर सह्या करणे, ते निष्पादित करणे आणि नोंदणी करणे."

(यावर भर देण्यात आला आहे. )

आणि अशा प्रकारे मान्य करण्यात आले:

"३४. म्हणून, वादपत्रामध्ये लिखित स्वरूपात कथन केलेले नसणे आणि विनंती खंड (ब)(iii) च्या संदर्भात हुकूमनामा स्वीकारणे, यामुळे देय किमतीमध्ये कर्जाच्या रकमेचा अंतर्भाव होता तितकेच मान्य केलेली किंमत अथवा मान्य केलेला मोबदला यांचा भरणा केल्यानंतर अग्रवाल यांच्याकडे अन्य कोणतेही दावे शिल्लक राहिलेले नसतील हे मान्य करण्यात मला कोणताही संकोच वाटत नाही."

(यावर भर देण्यात आला आहे. )

६. अपीलामध्ये, खंडपीठाने आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे एकल न्यायाधीशांच्या मतास सहमती दर्शवली. न्यायालयाने असा निर्णय दिला की, एकल न्यायाधीशांचा वादकथनामध्ये लक्ष घालण्याचा स्वेच्छाधिकार, कोणत्याही परिस्थितीत 'हुकूमनाम्याची वैधता तपासणे', परस्पर संबंध असलेल्या न्याय निर्णयांवर भिस्त ठेवणे या बाबींसाठी प्रस्थापित झाला नव्हता आणि पक्षकारांमधील परस्परांचे ई-मेल, विशेषतः रकमेच्या विभाजनाबाबत ( वर नमूद केलेल्या परिच्छेद ३ मधील) दिनांक २९.०३.२०१९ रोजी केलेल्या ई-मेलवर भर दिला होता, जो कोठारी यांच्या दाव्यातसुद्धा ( दाव्याच्या परिच्छेद १२ मध्ये) प्रतीत झाला आहे आणि असा निर्णय दिला की अशा प्रकारे एकूण मोबदल्याच्या रुपये ३६.७५ इतक्या रकमेमध्ये कर्जाच्या रकमेचा समावेश आहे.

> "२० . अनुमानाअंती, आम्हास असे वाटते की वादपत्रांमध्ये सादर करण्यात आलेली दृढ कथने न नाकारता किंवा त्याबाबत कोणतेही भाष्य न करता अग्रवाल यांनी हुकूमनामा स्वीकारल्यानंतर त्याच्या स्वरूपाला हरकत घेण्याचा दृष्टिकोन ही कदाचित एक चतुरपणाची कृती आहे ज्याला कोणत्याही समानतावादी न्यायालयाने पाठबळ देऊ नये. वादपत्राच्या परिच्छेद

बारा मध्ये कोठारी यांना काय म्हणायचे होते ते अग्रवाल यांना पूर्णपणे चांगलेच ठाऊक होते. दिनांक २८ मार्च, २०१९ रोजीचा ईमेल संदेश हा आदल्या दिवशीच्या तोंडी करारनाम्याच्या संदर्भात होता असे कोठारी यांनी म्हणताना त्यांना त्याचा काय अर्थ अभिप्रेत होता हे त्यांना (अग्रवाल) निश्चित माहित होते. पान क्रमांक ५४५ वरील दिनांक २९ मार्च, २०१९ रोजीच्या कोठारी यांच्या ईमेल संदेशामुळे, ज्याद्वारे ' मोबदला ' शब्दाचा काय अर्थ आहे हे परिच्छेद तीन मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, ह्या संदर्भातील कोणतीही संदिग्धता दूर झालेली आहे. ही गोष्ट सुद्धा नाकारण्यात आलेली नाही. आता असे म्हणणे की हुकूमनामा हा नाही जो होता परंतु दुसरेच काही आहे हे कोठारी यांचे म्हणणे नसून अग्रवाल यांचे आहे ज्यांना न्यायालयाने

हुकूमनाम्यामध्ये लक्ष पुरवावे असे वाटते. हा, हुकूमनाम्यामध्ये असा संपूर्णतया फेरफार करण्याचा प्रयत्न आहे ज्याबाबत कधी विचारही केला नव्हता."

(यावर भर देण्यात आला आहे. )

म्हणून प्रस्तुत अपील दाखल केलेले आहे.

**<u>II. पक्षकारांचे युक्तिवाद</u>** :

७. अपीलकर्त्यांचे विद्वान वरिष्ठ वकील श्री. शाम दिवाण यांनी असे सादर केले की मीनाक्षी सक्सेना विरुद्ध ईसीजीसी लिमिटेड[5] यांसारख्या प्रकरणासह या न्यायालयाने दिलेल्या विविध न्यायनिर्णयांमध्ये नमूद केल्यानुसार वादकथनाच्या विश्लेषणामार्फत अंमलबजावणी न्यायालयाने अधिकार नसताना, स्वतःच्या अधिकाराच्या व्याप्तीचा विस्तार करीत, हुकूमनाम्याच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित केले. यावर भर देण्यात आला की, दिनांक २७.०३.२०१९ रोजी पक्षकारांनी केलेला तोंडी करारनामा हा श्री पवन दिडवानिया, मध्यस्थ यांनी सुलभ केला आणि त्याच दिवशी संध्याकाळी, श्री. सत्यनारायणन श्रीमाळी यांच्या उपस्थितीत दृढ करण्यात आला आणि शिल्लक रकमेच्या समावेशाबाबत

5 मीनाक्षी सक्सेना विरुद्ध ईसीजीसी लिमिटेड, (२०१८) ७ एससीसी ४७९

काहीही चर्चा न करता, दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक २८.०३.२०१९ रोजीच्या ईमेल द्वारे लिखित स्वरूपात नोंदविण्यात आला. अग्रवाल यांनी केवळ दिनांक २८.०३.२०१९ रोजीच्या ई-मेल मधील अटींना संमती दिली होती आणि जरी दाव्यांमध्ये आणि दृढकथनांमध्ये अशा पत्रव्यवहारांचा आणि पत्रांचा उल्लेख केला होता तरीही नंतरच्या अशा कोणत्याही पत्रव्यवहारास त्यांनी संमती दिली नव्हती. म्हणून हे असे स्पष्ट प्रकरण होते, जिथे पक्षकारांनी हुकूमनाम्यातील अटीनुसार केवळ संमती दिलेल्या आणि लिखित स्वरूपात मांडलेल्या अटींना जाणीवपूर्वक समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता.

८. असे सादर करण्यात आले होते की, जरी उच्च न्यायालयाला असे युक्तिवादांतर्गत विधान करणे अनुज्ञेय असले तरीही सदर न्यायालयाची वादकथने विचारात घेताना निवडक ई-मेल / पत्रांची दखल घेण्यात चूक झाली. हे निदर्शनास आणून देण्यात आले की, दाव्याच्या प्रकथनामध्ये ई-मेल्सच्या देवाणघेवाणीबाबत स्पष्टपणे सविस्तर रितीने हकीकत सांगितली होती आणि ते फक्त दिनांक २९/०३/२०१९ च्या ईमेल पुरते मर्यादित नव्हते तर ते इतर इमेल्स जे उत्तरवादी / वादी यांनी संबोधित केले आहे जसे की, दिनांक ०३/०४/२०१९ रोजीचा कोठारीज यांचा ईमेल, दिनांक ११/०४/२०१९ रोजी या ईमेलवर अग्रवाल यांच्याकडून प्राप्त झालेला ई-मेल कोठारीज यांच्या समझोत्यांच्या अटींसंदर्भात केलेल्या भाष्यासंदर्भात स्पष्टपणे विरोध करणारा असा ई-मेल आहे. दाव्यामध्ये दिनांक १९/०४/२०१९ रोजीच्या आणखी एका ईमेलचा संदर्भ दिला गेला, जो कोठारीजच्या स्थितीचा पुनरुच्चार करते की, रुपये ३६.७५ करोडची रक्कम ही 'संयुक्त रक्कम' होती आणि यापुढे अग्रवाल्स यांना काहीही देय नव्हते. तशाच

प्रकारे, विद्वान वकिलांनी सुद्धा कोठारीज ने दावा दाखल केल्यानंतर म्हणजेच दिनांक १९/०७/२०१९ आणि २३/०७/२०१९ रोजी देवाणघेवाण केलेल्या ई-मेल्स वर भिस्त ठेवली. अशा परिस्थितीत हुकूमनाम्याची अर्थउकल करताना त्याच्या अटींमध्ये नमूद केलेल्या पेक्षा अधिक काही अर्थ काढताना, न्यायालय केवळ दोन किंवा तीन ईमेल वर भिस्त ठेवून राहू शकत नाही.

९. श्री. दिवाण यांनी प्रथम मध्यस्थी श्री पवन दिडवानीया यांच्या प्रतिज्ञापत्रावर भिस्त ठेवली ज्यामध्ये, त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, कोणत्याही कर्जाच्या समायोजनावर कधीही चर्चा किंवा करार झालेला नाही आणि की, अग्रवाल्स यांना त्यांच्या फक्त ५०% समभागापोटी रुपये ३६.७५ करोड हे कोठारीजकडून मिळतील.

१०. दुसरीकडे कोठारीज यांच्या वतीने उपस्थित असणारे विद्वान जेष्ठ वकील श्री शेखर नाफडे आणि श्री पल्लव शिशोडिया यांनी स्पष्टपणे उद्युक्त केले की, अक्षेपित आदेशामध्ये हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. दिनांक २८/०३/२०१९ च्या ईमेल मध्ये प्रतिबिंबित झाल्याप्रमाणे अग्रवाल्स यांच्या कबुलीवर विनिर्दिष्ट पालनाकरिता हुकूमनामा पारित झाला होता. त्या ईमेलमध्ये वापरलेले शब्दप्रयोग म्हणजेच 'एकत्रित किंमत' म्हणजे समझोता हे 'पूर्ण नियंत्रण' प्रदान करेल आणि की, करारनामा हा अग्रवाल्स यांच्या 'भाग भांडवलासंबंधी' आणि 'सुरळीत संक्रमणाकरिता' होता जो, गटांच्या संपूर्ण विभक्तीकरणाकडे निर्देश करतो. परिणामी, रुपये ३६.७५ करोडची रक्कम ही एक संयुक्त रक्कम होती जिचा अर्थ अग्रवाल्स यांचे कंपनीवरील सर्व दाव्यांमधून मुक्त होणे हा होता. कोठारीज यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, त्यांच्याकडून देऊ केलेली रक्कम, जर

स्वीकारली, ती 'सर्व दाव्यांमध्ये' समझोता करण्यासाठी होती, जिचा उल्लेख त्यांच्या दाव्यातील प्रार्थनेमध्ये देखील केलेला आहे. (वरील परिच्छेद ५ पहा)

११. विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणांमध्ये निर्माण केलेली तथाकथित संदिग्धता ही एक प्रकारची पश्चातबुद्धी आहे, जी पारित करण्यात आलेल्या हुकूमनाम्यापासून सुटका करून घेणे आणि टाळाटाळ करणे यासाठी होती. पुढे वस्तूस्थिती अशी आहे की, अग्रवाल्स यांनी वादपत्राकरिता लेखी कथन सादर केले नाही किंवा नोटिस ऑफ मोशनला कोणतेही उत्तर दिले नाही, जे कोठारीजच्या दिनांक २८/०३/२०१९ च्या पुढील ई-मेल्सच्या अर्था मधील वादकथनांना प्रतिवाद करेल, जे स्पष्टपणे त्यांचा दाव्यातील ठाम विधानांचा स्वीकार दर्शवते. ह्या सादरीकरणाला अधिक बळकटी आणण्यासाठी या न्यायालयाच्या राजिंदर कुमार वि. कुलदीप सिंग[6], एस. सतनाम सिंग आणि इतर वि. सुरेंदर कौर आणि इतर[7], भवन वाजा आणि इतर वि. सोलंकी हानोजी खोडाजी मनसंग[8], प्रकरणांमधील न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवण्यात आली.

**III. विश्लेषण**

१२. दिनांक २८/०३/२०१९ च्या ईमेल द्वारे करारामध्ये निर्धारित केलेली रुपये ३६.७५ करोडची रक्कम ही कर्जाच्या रुपये १०,२९,५५,०००/- रकमेसह होती की नाही, केवळ हा मुद्दा विचारार्थ आहे.

१३. (दोन्ही पक्षकारांच्या संमतीनुसार) पारित करण्यात आलेला हुकूमनामा हा कोठारीज यांनी त्यांच्या दाव्यामधील प्रार्थनेचा भाग (अ) ते (ड) मधील सार

6 राजिंदर कुमार वि. कुलदीप सिंग, (२०१४ ) १५ एससीसी ५२९ .

7 एस. सतनाम सिंग आणि इतर वि. सुरेंदर कौर आणि इतर, (२००९ ) २ एससीसी ५६२.

8 भवन वाजा आणि इतर वि. सोलंकी हानोजी खोडाजी मनसंग, (१९७३) २ एससीसी ४०.

अधोरेखित करतो. ते दिनांक २८/०३/२०१९ रोजीच्या संमतीच्या अटींसमान आहे, 'जे प्रतिवादींच्या (म्हणजेच अग्रवाल यांच्या) ५०% समभागाच्या विक्रीला' अनुलक्षून आहे आणि थकीत कर्जाच्या रकमेबाबत स्वतंत्रपणे काहीही नमूद करत नाही.

१४. एकल न्यायाधीश यांनी केवळ कर्जाच्या रकमेबाबत वचनबद्धतेच्या अभावाच्या आधारावर हुकूमनाम्याचे वर्णन 'संदिग्ध' असे केले आहे आणि वादकथनांमध्ये लक्ष घालून, हुकूमनाम्याची वैधता तपासली (फक्त उत्तरवादींच्या वादकथनांमध्ये लक्ष घालून  कारण अपीलकर्त्याने कोणतेही वादकथन सादर केलेले नव्हते - न्यायालयाने त्याबाबत विरुद्ध अनुमान काढले होते) आणि हरकत घेतलेल्या रकमेचा समावेश करण्यासाठी, त्याची व्याप्ती वाढवण्याकरता हुकूमनाम्यामध्ये नमूद केलेल्या 'प्रतिवादींच्या सर्व दाव्यांपासून  मुक्त असे' यावर भिस्त ठेवली.  त्यास पुष्टि देत उच्च न्यायलायाच्या खंडपीठाने  करारनामा नमूद केलेल्या एका ई मेल संदेशच्या अनुषंगाने, ई मेल्स च्या देवाणघेवाणीवर, विशेषतः कोठारी यांनी पाठविलेला दिनांक २९.०३.२०१९ चा ई मेल संदेश, ज्यामध्ये सर्वप्रथम रकमेचे तपशील अधोरेखित केले होते व तो अग्रवाल यांनी दिनांक ११.०४.२०१९ च्या उत्तरात स्पष्टपणे नाकारला होता त्यावर भिस्त ठेवली. या समावेशावर एकमताचा स्पष्ट अभाव होता. अग्रवाल यांची संमती, त्यामध्ये नमूद करण्यासंबंधी दोन्ही न्यायालयांचे भाष्य हे कुरघोड़ी करण्याची एक कसरत आहे.

१५. या न्यायालयाने अशा पद्धतीचा अवलंब करणाऱ्या अंमलबजावणी न्यायालयाविरुद्ध वेळोवेळी सावध केले आहे.  टोपणमल छोटामल विरुद्ध

कुंडूमल गंगाराम[9] या प्रकरणांमध्ये तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने खालीलप्रमाणे निर्णय दिला.

> “ हे एक योग्यरित्या प्रस्थापित तत्व आहे की हुकूमनामा अमलात आणणारे न्यायालय हुकूमनाम्याची वैधता तपासू शकत नाही. त्यांनी हुकूमनामा जसा आहे तसाच घेतला पाहिजे कारण सदर हुकूमनामा दाव्यातील पक्षकारांवर बंधनकारक आणि निर्णायक आहे. “

तरीही मीनाक्षी सक्सेना (उपरोलिखित) मध्ये पुन्हा एकदा सदर बाबीचा पुनरुच्चार केला गेला की,

> "अंमलबजावणीच्या कार्यवाहीचा संपूर्ण उद्देश न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करणे हा आहे. हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना अंमलबजावणी न्यायालय, केवळ त्याच्या अंमलबजावणीच्या भागाशी संबंधित असते, इतर कोणत्याही बाबीशी नाही. न्यायालयाला न्यायनिर्णयाच्या सुरुवातीच्या भागानुसार विचार करावा लागतो. अंमलबजावणी करणारे न्यायालय हुकूमनाम्याच्या पलीकडे विचार करू शकत नाही असा प्रस्थापित कायदा आहे. पण जेव्हा हुकूमनाम्यामध्ये महत्त्वाच्या बाबींसंदर्भात संदीग्धता असते तेव्हा अडचण

9 टोपणमल छोटामल विरुद्ध कुंडूमल गंगाराम, एआयआर १९६० एससी ३८८.

निर्माण होते. नंतर त्यानंतर मग हुकूमनाम्याची खरी अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेमध्ये सदरच्या हुकूमनाम्याचा अर्थ लावणे, सदर न्यायालयाचे बंधनकारक कर्तव्य बनते. अशावेळी अंमलबजावणी न्यायालयास त्याचा अर्थ लावताना अत्यंत सावध राहावे लागते आणि ते नवीन हुकूमनामा पारित करू शकत नाही याची जाणीव ठेवावी लागते. हुकूमनामा अमलात आणण्याच्या प्रक्रियेत या अधिकारक्षेत्राचा वापर करताना अंमलबजावणी करणारे न्यायालय या दोघांमध्ये एक उत्तम संतुलन राखेल."

१६. सामान्यतः माहिती असल्यानुसार, प्रवाह त्याच्या स्त्रोताच्या पुढे जाऊ शकत नाही. दोन्ही न्यायालयांनी निवडक ई-मेलचे अवलोकन करून करारामधील मोबदल्याच्या रकमेत कर्जाची रक्कम समाविष्ट करण्यासाठी हुकूमनाम्याच्या अटींमध्ये बदल केले आहेत. हे लक्षात घेणेदेखील अत्यावश्यक आहे की २०१७ मध्ये पक्षकारांमध्ये झालेल्या संयुक्त उपक्रम करारातील कलमे ज्याद्वारे सर्व थकीत कर्जे निकाली काढण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची तरतूद केली होती, अस्तित्वात असून सुद्धा सदर बाब नमूद केली होती.

"कलम ४ : कोंडीच्या बाबतीत समभागांची एकमेकांना विक्री करण्यासाठी गटांमध्ये बोली लावली जाईल आणि आणि शक्यतो एकाच वेळी रक्कम प्रदान करून किंवा दोन्ही गटांनी मान्य केलेल्या अटीनुसार परंतु कोणत्याही परिस्थितीत

बोली / कराराच्या तारखेपासून १८० दिवसांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीत रक्कम प्रदान करणाऱ्या व सहभागांसाठी सर्वात जास्त मूल्य देणाऱ्या गटाकडे ( यशस्वी बोलीदार / खरेदीदार ) कंपनीची मालकी राहील.

कलम ५ : समभाग हस्तांतरणासाठी सदर गटांमध्ये जो काही विचार करण्यात आला आहे किंवा परस्पर सामंजस्याने विक्रेत्याच्या खात्यात रक्कम सरळपणे जमा होण्यासाठी रक्कम प्रदानाकरिता जी काही समयसीमा निश्चित करण्यात आली आहे तिचे विक्रेत्यास सहजरीत्या व्यवहारामधून बाहेर पडण्यासाठी, खरेदीदार काटेकोरपणे पालन करेल व रक्कम प्रदान करताना जर काही उशीर झाला तर खरेदीदारास १८ टक्के दराने चक्रवाढव्याज भरावे लागेल. व्याजासह (जर असल्यास) रक्कमेचे प्रदान पूर्ण होईपर्यंत विक्रेता गटाचा त्यांच्या समभागांवर धारणाधिकार असेल. विक्रेत्याचे कर्ज आणि अग्रीम रकमेची परतफेड खरेदीदाराने बोली/ कराराच्या १५ दिवसांच्या आत स्वतंत्रपणे केली पाहिजे. ती नं केल्यास बोली / कराराच्या तारखेपासून मुद्दल रक्कम व १८ % प्रति वर्ष चक्रवाढव्याज हे दोन्ही, कंपनीच्या खात्यातून वळविले जाईल. दोन्ही प्रदाने पूर्ण झाल्यानंतर विक्रेत्याच्या गटाचे समभाग खरेदीदार गटात हस्तांतरित केले आहेत असे समजले जाईल आणि विक्रेता कोणत्याही कारणाने

हस्तांतरणास विलंब करू शकणार नाही."

(यावर भर दिला ).

१७. अशा प्रकारे संयुक्त उपक्रम करारामध्ये बोलीप्रक्रिया आणि त्यानंतरच्या कर्जाची परतफेड यांच्यातील स्पष्ट फरक देखील विचारात घेतला गेला. 'एकत्रित किंमत' या शब्दांचा वापर कर्जाच्या रकमेचा समावेश दर्शवतो, हा उत्तर वादींचा युक्तिवाद तथ्यतःच स्वीकारला जाऊ शकत नाही, कारण वादकथनांवरून हे स्पष्ट होते की पक्षकारांनी केवळ पन्नास टक्के समभाग धारण केलेल्या संपूर्ण मूल्यांकनावर चर्चा केली होती ज्याची किंमत कोठारी यांनी रुपये ७० कोटी एवढी मर्यादित ठेवली होती. कर्जाच्या परतफेडीच्या रकमेमध्ये या व्यवहाराचा उद्देश दृष्टीसमोर ठेवून सुरळीत संक्रमणाबाबत कोणताही व्यत्यय नाही आणि अशा रीतीने त्याची अर्थउकल चुकीची आहे.

१८. उत्तरवादी यांनी देखील ज्या न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली आहे ते देखील यातील तथ्यांपेक्षा वेगळे आहे. एस. सतनाम सिंग वि. सुरेंदर कौर[10], या प्रकरणामध्ये, न्यायचौकशी न्यायालयाच्या आदेशांत मिळकतीच्या यादीमध्ये वाढ करण्यासाठी विभाजनाच्या दाव्यातील प्राथमिक हुकूमनाम्यात सुधारणा करण्यात चुक होती का, हा प्रश्न विचाराधीन होता. या न्यायालयाने असे मानले की केवळ अशी चूक दुरुस्त करण्याची कृती दुरुस्ती केलेल्या हुकूमनाम्याची

10 एस. सतनाम सिंग वि. सुरेंदर कौर, (२००९) २ एससीसी ५६२

विफलता होत नाही. ह्या निर्णयात[11] मान्य केल्याप्रमाणे, 'हुकूमनामा' ह्या व्याख्येवर वकिलांची भिस्त उत्तरवादीच्या निवेदनाचे समर्थन करण्यासाठी फारच थोडी मदत करते कारण स्पष्टपणे कनिष्ठ न्यायालयांनी सर्वांगीण पद्धतीने हुकूमनामा पारित होण्यापर्यंतच्या तथ्यांकडे लक्ष दिलेले नाही.

१९. राजिंदर कुमार विरुद्ध कुलदीप सिंग[12] ह्या प्रकरणासंदर्भात वकिलाने खालील परिच्छेदावर भिस्त ठेवली आहे:

> " विनिर्दिष्ट पालनाकरिताच्या खटल्यात, त्यामध्ये प्रार्थना केल्यानुसार हुकूमनामा पारित करण्यात आला नसेल तर त्यावेळेस पर्यायी अनुतोशासाठी कोणत्याही संदर्भाचा प्रश्न निर्माण होईल आणि म्हणून कोणत्याही प्रकारच्या संदिग्धतेचा प्रश्न येत नाही. टोपणमल छोटामल विरुद्ध कुंडोमल गंगाराम ( टोपणमल विरुद्ध कुंडोमल गंगाराम ए आय आर १९६० सर्वोच्च न्यायालय ३८८ , पृष्ठ क्रमांक ३९० परीच्छेद ४ मध्ये) प्रस्तुत न्यायालयाने गृहीत धरल्यानुसार, "४. सगळ्यात वाईट म्हणजे हुकूमनामा संदिग्ध आहे असे म्हणता येईल अशा प्रकरणात

---

11 आयडी "१५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम २ (२) मध्ये हुकुमनाम्याची व्याख्या केली आहे.

"२. (२) ... ज्या अभिनिर्णयादवारे तो व्यक्त करणारे न्यायालय दाव्यातील सर्व अथवा त्यांपैकी कोणत्याही विवाद्य बाबींच्या संबंधात पक्षकारांचे अधिकार जेथवर निर्णायकपणे ठरवते तेथवर त्या अभिनिर्णयाची रीतसर अभिव्यक्ती असा आहे आणि हुकूमनामा प्रारंभिक किंवा अंतिम असू शकेल.

तो अंशतः प्रारंभिक किंवा अंशतः अंतिम असू शकेल. न्यायालयाने पारित केलेला आदेश हा हुकूमनामा आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी सादर न्यायालयाने पक्षकारांनी वादकथने आणि आदेश पारित होईपर्यंतची कार्यवाही विचारात घेणे आवश्यक आहे. ज्या परिस्थितीत आदेश पारित करण्यात आला होता तो देखील संबंधित असला पाहिजे. "

12 राजिंदर कुमार विरुद्ध कुलदीप सिंग, (२०१४) १५ एससीसी ५२९

हुकूमनाम्याचा अन्वयार्थ लावणे हे अंमलबजावणी न्यायालयाचे कर्तव्य आहे. जेव्हा हुकूमनाम्याच्या शर्ती संधिग्ध असतात तेव्हा हुकूमनाम्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी न्यायालयास वादकथने आणि न्यायनिर्णय विचारात घेण्याचा हक्क असेल. आणि सुसंगतरित्या अनुसरण केल्यावरही जर त्यामध्ये संधिग्धता असेल तर अंमलबजावणी न्यायालयाने जरूर तर न्यायनिर्णयाचा संदर्भ घेऊन हुकूमनाम्याचा अन्वयार्थ लावला पाहिजे. परंतु जेव्हा न्यायनिर्णयामधूनही पुरेसे मार्गदर्शन उपलब्ध होत नसल्यास हुकूमनाम्याचा खरा अन्वयार्थ लावण्यासाठी वादकथनांचा संदर्भ घेण्याची मुभा आहे. परंतु न्यायालय हुकूमनाम्यामधील आदेशामध्ये नमूद मजकुराविरोधात किंवा त्यापलीकडेही जाऊ शकत नाही. परंतु विनिर्दिष्ट पालनाकरता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना कोणतीही संदिग्धता असल्यास, पक्षकाराच्या हेतूला परिणाम देण्यासाठी न्यायालयाने सदर हुकूमनाम्याचा अन्वयार्थ लावणे आवश्यक आहे. अशा रीतीने प्रस्तुत प्रकरणात मालमत्तेचे हस्तांतरण करण्याच्या बाबतीत विनिर्दिष्ट पालनाकरिता हुकुमनामा पारित करण्यात आला असल्यामुळे नुकसानीच्या बाबतीत पर्यायी दिलासा देण्याचा प्रश्नच येत नाही."

कायद्याचे हे स्पष्टीकरण अनाक्षेपार्ह आहे. हे नाकारण्याजोगे नाही की जर हुकूमनामा संदिग्ध असल्यास अंमलबजावणी न्यायालय त्याचा अन्वयार्थ लावू शकते. तथापि, या खटल्यातील तथ्यांप्रमाणे, याचा परिणाम (२८.०३.२०१९ रोजीच्या ईमेल संदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या संमतीच्या अटींमध्ये) वाढ असा होऊ शकत नाही, ज्यावर दोन्ही पक्षकारांनी सहमती दर्शवली नाही, कारण दाखल होण्याच्या टप्प्यावरच हुकूमनामा दोन्ही पक्षांचे संमतीने काढण्यात आला होता. उच्च न्यायालयाचे एकल न्यायाधीश आणि खंडपीठ या दोघांनीही, अपीलकर्त्यांच्या मौनाचा (कोणतेही लेखी निवेदन न सादर केल्याने ते जाहीर होते) कर्जाच्या रकमेच्या समावेशास मूकसंमती असा अर्थ लावला आहे, जे प्रतिकूल अनुमानास पात्र असले तरी ते हुकूमनाम्याच्या विस्ताराचे समर्थन करण्यासाठी कारण असू शकत नाही.

२०. अशा प्रकारे, अपील मान्य करण्यात येत आहेत. आक्षेपित न्यायनिर्णय रद्द करण्यात येत आहे. खर्चाबाबत कोणताही आदेश असणार नाही.

....................................................न्या.

[कृष्ण मुरारी]

.................................................न्या.

[एस. रवींद्र भट]

नवी दिल्ली,

२१ फेब्रुवारी २०२३.

x-x-x-x

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x